# <u>जिल्हा व सत्र न्यायालय, अहमदनगर.</u>

## <u>डि. एस. पी. चौक जवळ, अहमदनगर - ४११ ००१</u>

फोन नं. ०२४१-२३५११११

ई-मेल – mahahmdc@mhstate.nic.in

**जिल्हा न्यायालय, अहमदनगर ई-निविदा क्र. / २०२६, दिनांक ८/१० /२०२६**

..............................................................................................................

जिल्हा न्यायालय, अहमदनगर येथे पोक्सो न्यायालय व अहमदनगर व संगमनेर येथील विशेष जलदगती न्यायालयांकरीता लिपीक-टंकलेखक व बहुउद्देशिय गट-ड कर्मचारी (शिपाई इ.) यांची सेवा १ वर्षे कालावधीकरिता बाहययंत्रणेव्दारे संस्था/कंत्राटदारामार्फत घेण्यास महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्रमांक: जगन्या १४१९/५/प्र.क्र.४/का-नऊ मंत्रालय, मुंबई दिनांक: ०४ मार्च,२०२० तसेच महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्रमांक: जगन्या १४१९/५/प्र.क्र.४/का-नऊ मंत्रालय, मुंबई दिनांक: ०९ मार्च,२०२३ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

जिल्हा न्यायालय, अहमदनगर येथे पोक्सो न्यायालया करीता लिपीक-टंकलेखक ०३ पदे व बहुउद्देशिय गट -ड कर्मचारी (शिपाई इ.) ०२ पदे तसेच विशेष जलदगती न्यायालया करीता लिपीक-टंकलेखक ०३ पदे व बहुउद्देशिय गट -ड कर्मचारी (शिपाई इ.) ०२ पदे व संगमनेर येथील विशेष जलदगती न्यायालया करीता लिपीक-टंकलेखक ०३ पदे व बहुउद्देशिय गट -ड कर्मचारी (शिपाई इ.) ०२ पदे अशी एकुण १५ पदे बाहय यंत्रणेव्दारे कंत्राटी पध्दतीने १ वर्षे कालावधीकरीता उपलब्ध करून घेणे कामी इच्छुक निविदा धारकांकडून ई-निविदा मागविण्यात येत आहे.

### <u>विभाग-१</u>

१. **निविदा स्वरूप :-**

जिल्हा न्यायालय, अहमदनगर येथे पोक्सो न्यायालया करीता लिपीक-टंकलेखक ०३ पदे व बहुउद्देशिय गट -ड कर्मचारी (शिपाई इ.) ०२ पदे तसेच विशेष जलदगती न्यायालया करीता लिपीक-टंकलेखक ०३ पदे व बहुउद्देशिय गट -ड कर्मचारी (शिपाई इ.) ०२ पदे व संगमनेर येथील विशेष जलदगती न्यायालया करीता लिपीक-टंकलेखक ०३ पदे व बहुउद्देशिय गट -ड कर्मचारी (शिपाई इ.) ०२ पदे अशी एकुण १५ पदे बाहय यंत्रणेव्दारे कंत्राटी पध्दतीने १ वर्षे कालावधीकरीता उपलब्ध करून देणे.

२. **निविदा फॉर्म फी** :- रू. १०,०००/- ना परतावा ( अक्षरी दहा हजार रुपये मात्र)

३. **अंदाजित रक्कम** :- रू. ५०,४६,१३४/- ( एक वर्षाकरीता)

४. **बयाणा रक्कम** :- रू. १,००,०००/- (अक्षरी एक लाख रुपये मात्र)

५. **कामाचा कालावधी** :- १ वर्षं

६. **सुरक्षा ठेव रक्कम** :- निविदा रक्कमेच्या ३ टक्के

| | | | |
|---|---|---|---|
| ७. | **ई-निविदा विक्री व सादर करणेस सुरुवात दिनांक** | :- | दि. १५/१०/२०२६ सकाळी ११.०० वाजेपासून |
| ८. | **ई-निविदा स्वीकारणेचा अंतिम दिनांक** | :- | दि. २८/१०/२०२६ सायंकाळी ०५.३० वाजेपर्यंत |
| ९. | **ई-निविदा उघडविण्याचा दिनांक** | :- | अ) तांत्रिक निविदा-लिफाफा क्र. १ जिल्हा व सत्र न्यायायल, अहमदनगर येथे दि. ३०/१०/२०२६ रोजी सायंकाळी ०५.३० वाजता किंवा मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर यांचे आदेशानुसार तारखेस.<br><br>ब) व्यापारी/आर्थिक निविदा लिफाफा क्र. २ तांत्रिक निविदेतील कागदपत्रांची पडताळणी झाल्यानंतर पात्र निविदा धारकांची आर्थिक निविदा उघडण्यात येईल. |

(एस. बी. कचरे)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
अहमदनगर.

अहमदनगर.
दिनांक :- ८/१०/२०२६

## परिशिष्ट ०१

# जिल्हा व सत्र न्यायालय, अहमदनगर व संगमनेर येथील न्यायालयातील खालील पदांच्या कामाचे स्वरूप

| अ.क्र. | पदाचे नाव | कामाचे स्वरूप |
|---|---|---|
| १ | लिपीक टंकलेखक | न्यायालयातील विशेष जलदगती न्यायालयामधील न्यायालयीन कामकाजामध्ये मदत करणे, न्यायीक अधिकारी / कर्मचारी जी लिपीक वर्गीय कामे सांगतील ती सर्व कामे व इतर कामे इत्यादी. |
| २ | बहुउद्देशिय गट-ड, (शिपाई) | न्यायालयातील कक्षामधील (झाडणे, फर्निचर पुसुन) स्वच्छता करणे, शाखेमधील संचिकांची न्यायालय अंतर्गत ने-आण करणे, पक्षकार यांना पुकारा करणे, संबंधीत न्यायीक अधिकारी / कर्मचारी जी कामे सांगतील ती सर्व कामे करणे. |

(एस. बी. कचरे)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
अहमदनगर.

अहमदनगर.
दिनांक :- ८/१०/२०२६

## विभाग-२

जिल्हा न्यायालय, अहमदनगर येथे पोक्सो न्यायालया करीता लिपीक-टंकलेखक ०३ पदे व बहुउद्देशिय गट -ड कर्मचारी (शिपाई इ.) ०२ पदे तसेच विशेष जलदगती न्यायालया करीता लिपीक-टंकलेखक ०३ पदे व बहुउद्देशिय गट -ड कर्मचारी (शिपाई इ.) ०२ पदे व संगमनेर येथील विशेष जलदगती न्यायालया करीता लिपीक-टंकलेखक ०३ पदे व बहुउद्देशिय गट -ड कर्मचारी (शिपाई इ.) ०२ पदे यांची सेवा १ वर्षे कालावधीकरिता बाहययंत्रणेव्दारे संस्था/कंत्राटदारामार्फत खालील प्रमाणे उपलब्ध करून घ्यावयाच्या आहेत.

| अ.क्र. | न्यायालयाचे नाव व ठिकाण | उपलब्ध करुन घ्यावयाच्या सेवा | एकुण पदांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | पोक्सो न्यायालय, अहमदनगर. | लिपीक-टंकलेखक | ३ |
| | | बहुउद्देशिय गट -ड कर्मचारी (शिपाई इ.) | २ |
| २ | विशेष जलदगती न्यायालय, अहमदनगर. | लिपीक-टंकलेखक | ३ |
| | | बहुउद्देशिय गट -ड कर्मचारी (शिपाई इ.) | २ |
| ३ | विशेष जलदगती न्यायालय, संगमनेर, जि. अहमदनगर. | लिपीक-टंकलेखक | ३ |
| | | बहुउद्देशिय गट -ड कर्मचारी (शिपाई इ.) | २ |
| | | **एकुण पदे :-** | **१५** |

| | |
|---|---|
| एक वर्षाची रक्कम | |

(एस. बी. कचरे)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
अहमदनगर.

अहमदनगर.
दिनांक :- ८/१०/२०२६

## विभाग-३

## अटी व शर्ती

१. ई-निविदा सुचनेमध्ये नमुद केलेल्या वेळापत्रकानुसार ई-निविदा पुस्तिका फॉर्म (Form) खरेदी/डाउनलोड/बिड भरणे/बिड समाविष्ट करणे/सेवा शुल्क जमा करणे/बयाना/अनामत रक्कम जमा करणे ही सर्व प्रक्रिया विहीत वेळेत पूर्ण करणे आवश्यक आहे, याची ई-निविदाकारांनी नोंद घ्यावी.

२. ई-निविदा दोन लिफाफा ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात येत आहेत. (तांत्रिक व व्यापारी) व्यापारी निविदा प्रपत्र १ व २ विहीत नमुन्यातच असावी.

३. कंत्राटदारास तो उपलब्ध करुन देत असलेल्या कंत्राटी सेवांसाठी शासन निर्णय क्र.पदनि २५१२ प्र.क्र./१५७ का.१२, दि.२७/०२/२०१३, २६/०२/२०१३, ०६/०३/२०१३, १९/०३/२०१४, ०३/०९/२०१४ व २७/०१/२०१५ व या संदर्भात वेळोवेळी निर्गमीत करण्यात आलेल्या सर्व शासन निर्णयातील (सदर शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत) निर्देशांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक आहे याची कृपया नोंद घ्यावी.

४. प्रपत्र-१ मधील माहिती कंत्राटदारांनी भरावयाची आहे.

५. संस्था/कंत्राटदारांनी त्यांच्यामार्फत नियुक्त केलेल्या मनुष्यबळास/कर्मचा-यांना द्यावयाची वेतनाची रक्कम व अतिकालीक भत्त्याची रक्कम ही किमान वेतन कायद्यातील तरतुदींपेक्षा कमी नसावी.

६. कंत्राटदाराने/संस्थेने/कंपनीने त्यांचे नोंदणी प्रमाणपत्र, वस्तु व सेवाकर प्रमाणपत्र, मागील तीन वर्षाचे आयकर प्रमाणपत्र, पॅनकार्ड, ई.एस.आय.सी. प्रमाणपत्र, पी.एफ.प्रमाणपत्र, प्रोफेशनल टॅक्स प्रमाणपत्र इत्यादींच्या स्वाक्षांकित छायांकित प्रती निविदेसोबत सादर करणे बंधनकारक आहे. सदर प्रमाणपत्रांच्या व कागदपत्रांच्या छायांकित प्रती न जोडल्यास त्यांचे निविदा अर्ज रद्द ठरविण्यात येतील.

७. संस्था/कंत्राटदार हे त्यांच्या वतीने नेमण्यात येणा-या कंत्राटी मनुष्यबळ/ कर्मचा-यांची नांवे, त्यांचा पत्ता, फोटो व त्यांची चारित्र विषयक प्रमाणपत्रे या कार्यालयात सादर करतील.

८. सदर कामाकरीता संस्था/कंत्राटदार यांना देय मोबदला हा एक महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर देण्यात येईल. काही तांत्रिक अथवा अपरिहार्य कारणास्तव मोबदला देण्यास उशीर झाल्यास सदर रक्कमेवर व्याज देय राहणार नाही. तसेच देण्यात येणा-या मोबदल्यावर कर भरण्याची जबाबदारी सर्वस्वी कंत्राटदार यांची राहील.

९. कर्मचा-यांच्या कामाच्या वेळा कंत्राटदार हे कार्यालयाच्या गरजेनुसार ठरवतील. तसेच सुट्टीच्या दिवशी देखील गरज भासल्यास काम करावे लागेल.

१०. न्यायालयीन इमारतीमधील विद्युत दिवे हे गरजेप्रमाणे चालू व बंद करण्याबाबतची जबाबदारी कंत्राटदाराने नेमलेल्या कर्मचारींवर राहील.

११. संस्था/कंत्राटदारास त्याने उक्त नमुद काम करणेसाठी नेमलेल्या कंत्राटी मनुष्यबळ/कर्मचारी यांना किमान वेतन अधिनियम १९४८ मधील तरतुदीनुसार वेतन, महागाई भत्ता, इतर भत्ते व सवलती लागु करणे कंत्राटदारावर बंधनकारक असेल.

१२. संस्था/कंत्राटदारामार्फत नियुक्त केल्या जाणा-या कर्मचा-यांना अदा करावयाची वेतनाची रक्कम ही किमान वेतन कायद्यातील तरतुदींनुसार कंत्राटदारांकडून कंत्राटी कर्मचा-याला देय असलेले किमान वेतन + विशेष भत्ता + भविष्य निर्वाह निधी + राज्य कामगार विमा योजनेत जमा करावयाची रक्कम + उपदान इत्यादी मिळून होणारी रक्कम कर्मचा-यांना अदा करण्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदारावर राहील.

१३. कंत्राटदाराने न्यायालय कामाकरिता नेमलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना किमान वेतन कायद्यातील तरतुदींपेक्षा कमी वेतन अदा केल्याचे निदर्शनास आले तर संबंधित कंत्राटदारावर किमान वेतन कायद्यातील तरतुदींप्रमाणे कारवाई करण्यात येईल व त्यांचे कंत्राट तात्काळ रद्द करुन त्याचे नांव काळ्या यादीत टाकण्याची कार्यवाही करण्यात येईल. त्या अनुषंगाने संस्था/कंत्राटदार यांना सुचित करण्यात येते की, त्यांनी नेमणुक केलेल्या कर्मचा-यांच्या वेतनाबाबतच्या किंवा सेवेबाबतच्या कोणत्याही तक्रारी या कार्यालयाकडे येणार नाही याची त्यांनी दखल घ्यावी.

१४. दुस-या व चौथ्या शनिवारी (कार्यालय बंद असेल त्या दिवशी) कर्मचा-यांना कामावर बोलविण्यात आले नसल्यास त्यांचे वेतन कापून घेण्यात येवू नये. तथापी दुस-या व चौथ्या शनिवारी (कार्यालय बंद असेल त्या दिवशी) कर्मचा-यांना काम करण्यासाठी कार्यालयात बोलविण्यात आले तर त्यांना कार्यालयात येणे बंधनकारक राहील व त्यासाठी त्यांना वेगळा मोबदला मिळणार नाही. किमान वेतन कायद्यातील तरतुदींप्रमाणे कंत्राटी कर्मचा-यांना दर आठवडयास एक (रविवारी) भरपगारी सुट्टी देणे ही बाब कंत्राटदार यांचेवर बंधनकारक राहील.

१५. सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी कर्मचा-यांना कामावर बोलविण्यात आले नसल्यास त्यांचे त्या दिवसाचे वेतन कापून घेण्यात येवू नये. तथापी सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी कर्मचा-यांना काम करण्यासाठी कार्यालयात बोलाविण्यात आले तर त्यांना कार्यालयात येणे बंधनकारक राहील व त्याऐवजी त्या कंत्राटी कर्मचा-यास बदली रजा अथवा किमान वेतन अधिनियम व कामगार कायद्यानुसार देय असलेले त्या दिवसाचे वेतन यापैकी कोणताही एक पर्याय निवडता येईल. कामगाराचे बदली रजेच्या/गैरहजेरीच्या दिवशी दुसरा कर्मचारी उपलब्ध करुन देण्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची असेल व उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कर्मचा-यांसाठी किमान वेतन कायदा व कामगार कायद्यातील तरतुदीनुसार योग्य ते वेतन संबंधित कार्यालयाकडून अदा करण्यात येईल.

१६. शासकीय वेळेनंतर कंत्राटी कर्मचा-यांना जास्तीचे शासकीय काम करावे लागल्यास, त्यांना अतिकालीक भत्ता (ओव्हरटाईम) देणे कंत्राटदारास बंधनकारक असेल व सदर अतिकालीक भत्ता देण्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदारावर असेल.

१७. संस्था/कंत्राटदार यांनी नेमणुक केलेले कर्मचा-यांना या कार्यालयाकडील सुचनेनुसार गणवेश व ओळखपत्र पुरविण्यात यावेत.

१८. संस्था/कंत्राटदार यांना देण्यात आलेल्या कंत्राटी सेवेबद्दल ते किंवा त्यांचे वतीने नेमण्यात आलेल्या कंत्राटी कर्मचारी यांना या कार्यालयाकडे कायमस्वरुपी नियुक्तीकरीता हक्क मागण्याचा अधिकार राहणार नाही.

१९. कंत्राटदार/ कंत्राटी कर्मचारी हे कार्यालयात काम करतांना त्यांचे नजरेस ज्या काही बाबी येतील त्या कार्यालयीन बाबी आहेत, याची जाणीव ठेवून त्या संबंधात आवश्यक ती गोपनियता ठेवतील. तसेच न्यायालयीन कामकाजात कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप होणार नाही याबाबतची दक्षता घेतील. गोपनियतेचा भंग झाल्यास सदरचा करार अंशत: अथवा पुर्णत: रद्द करण्यात येईल.

२०. कंत्राटदार हे त्यांच्या वतीने नेमण्यात आलेल्या कंत्राटी कर्मचा-यांकडून दररोज वक्तशीरपणे व नियमितपणे या कार्यालयाचे काम करवून घेतील. त्यांची कार्यालयातील वर्तणुक व कामाची गुणवत्ता उच्च दर्जाची राहील व त्यांचे उत्तरदायीत्व हे कार्यालयाच्या सर्व हितसंबंधाचे रक्षण करणेच राहील. तसेच कंत्राटदाराचे वतीने नेमण्यात आलेल्या कंत्राटी कर्मचा-यांकडून वक्तशीरपणे व नियमितपणे कार्यालयास उपद्रव होणार नाही याची काळजी घेवून काम करुन घेतील तसेच कर्मचारी अयोग्य व अपात्र असल्याचे अथवा त्यांचे अशोभनीय वर्तन असल्याचे आढळल्यास त्या कर्मचा-यांस काढून टाकणे संबंधीचे आदेश देण्याचे अधिकार या कार्यालयास राहतील.

२१. कंत्राटदाराने नेमलेल्या कर्मचा-यांस काम करतांना कोणतीही इजा, अपघात अथवा मनुष्यहानी झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील. त्यास हे कार्यालय कोणत्याही प्रकारे जबाबदार असणार नाही.

२२. कंत्राटासंबंधी कोणताही विवाद निर्माण झाल्यास हे कार्यालय नेमतील ते न्यायाधीश लवाद म्हणुन काम पाहतील व १९९६ च्या लवादाच्या कायद्यानुसार या विवादाबाबत त्यांचा निर्णय अंतिम असेल.

२३. कंत्राटदाराने नेमलेल्या कंत्राटी कर्मचा-यांकडून सरकारी मालमत्तेचे नुकसान झाले असे या कार्यालयास आढळून आल्यास कंत्राटदारास देण्यात येणा-या मोबदल्यामधुन सदर रक्कम वसुल करण्यात येईल.

२४. कंत्राटदाराने नेमलेले कर्मचारी व या कार्यालयामध्ये, मालक व कर्मचारी असे संबंध राहणार नाहीत. कंत्राटदार हे पेमेंट ऑफ वेजेस ॲक्ट १९३६, एम्लॉई प्राव्हीडंट फंड ॲक्ट, पेमेंट ऑफ ग्रॅच्युईटी ॲक्ट १९७२, वर्क्समन कॉम्पेन्सेशन ॲक्ट, वर्क्स कॉन्ट्रॅक्ट ॲक्ट, सेल्स टॅक्स ॲक्ट, मिनिमम वेजेस ॲक्ट १९४८, इंडस्टीयल डिसप्युट ॲक्ट १९४७ कॉन्ट्रॅक्ट लेबर (Prohibition & Regulation) ॲक्ट १९८६ या व ईतर सर्व कामगार कायद्यांच्या तरतुदींचे पालन करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. तसेच सदरच्या उपरोक्त कायद्याच्या परिणामांची जबाबदारी कंत्राटदारावर राहील. सदरचे काम करण्यासाठी कायदयानुसार लागणारे सर्व परवाने घेण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

२५. कंत्राटदारास अदा करावयाचे देयक प्रत्येक महिन्याच्या पाच तारखेपर्यंत उक्त नमुद तालुका आस्थापनेवर काम योग्य रितीने केल्याबाबतचे तेथील न्यायीक अधिकारी यांच्या सहीचे प्रमाणपत्र जिल्हा न्यायालय, अहमदनगर येथे जमा केल्यावरच अदा करण्यात येईल.

२६. जिल्हा न्यायालय अंतर्गत असलेल्या उक्त नमुद न्यायालयात सर्व प्रकारची कामे कंत्राटी पध्दतीने करुन घेतल्याबाबतचा मासिक अहवाल असमाधानकारक आल्यास कंत्राटदारास देण्यात येणा-या मोबदल्यातुन माननीय प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश ठरवतील त्याप्रमाणे रक्कम वजा करण्यात येईल.

२७. कंत्राटदार यांना एकूण कंत्राटाच्या रक्कमेच्या ३ टक्के रक्कम मुदत ठेव जमा द्वारे किंवा बँक गॅरंटीद्वारे एक वर्षाकरीता सुरक्षा ठेव म्हणून द्यावी लागेल, तसेच त्यांनी कराराच्या कोणत्याही अटी व शर्तीचा भंग केल्यास, मुदत ठेव/बँक गॅरंटीची रक्कम जप्त करण्याचा हक्क या कार्यालयास राहील. सेवा कराराच्या दरम्यान कंत्राटदाराची सेवा असमाधानकारक आढळून आल्यास सदर करार नोटीस देवून रद्द करण्यात येईल आणि सदरचे काम इतर दुस-या एजन्सीकडून कंत्राटदाराच्या जबाबदारीवर व त्याच्या खर्चाने दुसरी व्यवस्था होईपर्यंत करुन देणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील.

२८. कंत्राटदार यांनी बयाना/अनामत रक्कम (Earnest Money) ई-निविदा रक्कमेच्या कमीत कमी रक्कम रुपये १,००,०००/- Net Banking द्वारेच जमा करावी.

२९. सर्व ई-निविदा या माननीय प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर यांचे निजीकक्षात जिल्हा व सत्र न्यायालय, अहमदनगर येथे दिलेल्या तारखेस व वेळी उघडण्यात येतील.

३०. केवळ ई-निविदा किंवा बयाना/अनामत रक्कम जमा केली म्हणुन कंत्राटावर हक्क सांगता येणार नाही.

३१. कंत्राटदार यांनी कंत्राट दरम्यानच्या काळात वरील अटी व शर्तीचे पालन करेल असे हमीपत्र लिहून द्यावे लागेल.

३२. कंत्राटदारामार्फत नियुक्त करण्यात आलेल्या सर्व कंत्राटी कर्मचा-यांना कामाचे वेतन व त्यानुषंगीक इतर सर्व भत्ते रोख स्वरुपात अदा न करता संबंधित कंत्राटी कामगाराच्या नावाने Account Payee Cross Cheque

द्वारेच (रेखांकित धनादेशाद्वारेच) कंत्राटदार अदा करतील किंवा ई.सी.एस.द्वारे/एन.ई.एफ.टी.द्वारे त्यांचे बॅंक खात्यात जमा करतील.

३३. कंत्राटदाराने त्यांच्या मार्फत नियुक्त करण्यात आलेल्या सर्व कंत्राटी कर्मचा-यांना दिलेल्या वेतनाच्या इतर भत्त्यांच्या धनादेशाची (चेकची) छायांकित प्रत किंवा ई.सी.एस.द्वारे/एन.ई.एफ.टी.द्वारे वेतनाची रक्कम इतर भत्त्याची रक्कम कंत्राटी कामगारांच्या खात्यात जमा केल्याचे दर्शविणारे बॅंक अधिका-यांचे सहीचे विवरणपत्र (Statement) किंवा कंत्राटी कामगाराची स्वाक्षरी असलेले वेतन देयक (ज्यावर सदर धनादेश क्रमांक ई.सी.एस. क्रमांक/एन.ई.एफ.टी.क्रमांक लिहिलेला असेल) हे कंत्राटदाराने दरमहा या कार्यालयास सादर करावे, जोपर्यंत कंत्राटदार वरील कागदपत्रे संबंधीत कार्यालयास सादर करणार नाहीत तोपर्यंत सदरच्या महिन्याचे कंत्राटदाराचे देयक अदा करण्यात येणार नाहीत.

३४. कंत्राटदार हे त्यांचेमार्फत नेमणुक करण्यात येणा-या कर्मचा-यांचे हजेरी संबंधीत न्यायालयांतील अधिक्षक / सहायक अधिक्षक किंवा माननीय न्यायीक अधिकारी आदेशीत करतील त्या अधिकारी/ कर्मचारी यांचेकडे नोंदवतील. संबंधीत न्यायालयांतील अधिक्षक/सहायक अधिक्षक हे माननीय न्यायीक अधिकारी यांचेमार्फत वेतन अदा करणेकामी हजेरी अहवाल अधिक्षक, लेखा व वित्त विभाग, जिल्हा व सत्र न्यायालय, अहमदनगर यांचे कडे पाठविण्यात आले नंतर हजेरी अहवालातील हजेरी नुसार देयक अदा करतील.

३५. यशस्वी कंत्राटदाराने त्यांचेकडून नेमणुक करण्यात येणा-या कंत्राटी मनुष्यबळ / कर्मचा-यांची पोलीस पडताळणी प्रमाणपत्र या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील व यात कसून करु नये.

(एस. बी. कचरे)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
अहमदनगर.

अहमदनगर.
दिनांक :- ८/१०/२०२६

**शैक्षणिक पात्रता - लिपीक टंकलेखक- या पदाकरिता शैक्षणिक पात्रता पुढीलप्रमाणे राहील.**

१. कोणत्याही मान्यताप्राप्त विदयापीठातून पदवी घेतलेली असणे आवश्यक आहे.

२. त्यास जिल्हयातील न्यायालयाच्या प्रादेशिक भाषेचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक आहे.

३. सरकारी व्यावसायिक प्रमाणपत्र परीक्षा किंवा सरकारी मंडळाद्वारे घेतलेली परीक्षा किंवा संगणक टंकलेखन बेसिक कोर्स यामध्ये सरकारी प्रमाणपत्र (GCC-TBC) किंवा (I. T. I.) यामध्ये इंग्रजी टंकलेखन ४० श. प्र. मि. किंवा त्याहुन अधिक गती आणि मराठी टंकलेखन ३० श. प्र. मि. किंवा त्याहुन अधिक गती.

४. खालीलपैकी कोणत्याही संस्थेतून प्राप्त M. S. Office, M. S. Word, Wordstar-7 आणि Open Office Org. या व्यतिरिक्त Windows आणि Linux असणे आवश्यक आहे.

   i. महाराष्ट्र किंवा गोवा राज्यातील वैधानिक विदयापीठे, यथास्थिती.

   ii. महाराष्ट्र किंवा गोवा राज्य तंत्र शिक्षण मंडळ, यशास्थिती.

   iii. NIC, DOEACC, APTECH, NIIT, C-DAC, DATAPRO, SSI, BOSTON, CEDIT, M.S.CIT.

   iv. महाराष्ट्र किंवा गोवा सरकारने जारी केलेले संगणक ज्ञानाच्या पात्रतेबाबतचे प्रमाणपत्र, यशास्थिती.

**कामाचे स्वरूप (लिपीक टंकलेखक पदासाठी)**

१. सर्व प्रकारच्या नोंदवहया लिहिणे, हाताळणे, तयार करणे व त्या संबंधीत सर्व कामकाज पाहणे.

२. सर्व प्रकारचे साप्ताहिक, पंधरवाडे, मासिक, त्रैमासिक, सहामाही, वार्षिक माहिती व विवरणपत्रे हस्तगत करणे, तयार करणे, एकत्रित करणे, तसेच सांख्यिकी विवरणपत्रे तयार करणे आणि या सर्व बाबतीत वेगवेगळे शासकीय कार्यालय, मा. उच्च न्यायालय, मुंबई, जिल्हा न्यायालय, अहमदनगर व जिल्हा विधी सेवा समिती यांना वेळोवेळी विहित कालावधीत माहिती पाठविणे.

३. न्यायालयातील विशेष जलदगती न्यायालयामधील न्यायालयीन कामकाजामध्ये मदत करणे, न्यायीक अधिकारी / कर्मचारी जी लिपीक वर्गीय कामे सांगतील ती सर्व कामे व इतर कामे इत्यादी.

## शिपाई पदासाठी शैक्षणिक पात्रता

उमेदवाराने किमान ७ वी परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी आणि त्याची शरीरयष्टी चांगली असावी.

**कामाचे स्वरूप**

फर्निचर आणि यंत्रसामग्री सह संपूर्ण कार्यालयाचा (कचरा आणि धुळसाफ करणे). कागदपत्रे, कागदाची पुस्तके, विविध विभाग आणि कार्यालयांना पत्रे वितरीत करणे. शाखेमधील संचिकांची न्यायालय अंतर्गत ने-आण करणे, पक्षकार यांना पुकारा करणे, संबंधीत न्यायीक अधिकारी / कर्मचारी जी कामे सांगतील ती कामे करणे.

**वयोमर्यादा :- (लिपीक-टंकलेखक व शिपाई या पदांकरिता)**

उमेदवाराची सर्वसाधारण वयोमर्यादा ही कमीत कमी १८ पुर्ण व ४५ पेक्षा जास्त नसावी.

**(एस. बी. कचरे)**
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
अहमदनगर.

अहमदनगर.
दिनांक :- ८/ १०/२०२६

## विभाग-४

### जिल्हा न्यायालय, अहमदनगर

### ई -निविदेचे सविस्तर वेळापत्रक

| | | |
|---|---|---|
| १ | निविदेचा संदर्भ : | ई-निविदा सुचना प्रसिद्धी दिनांक – १३/१०/२०२६ रोजी एका प्रमुख विभागीय स्तरावरील वर्तमानपत्रात आणि एका राज्य स्तरावरील वर्तमानपत्रात व संकेतस्थळावर दिलेल्या सूचना. |
| २ | निविदा प्रपत्र उपलब्धतेबाबतचा कालावधी : | वेळ सकाळी १५/१०/२०२६<br>वेळ: सकाळी ११.०० वाजेपासून ते दि. २८/१०/२०२६, वेळ : सायंकाळी ५:३० वाजेपर्यंत<br>संकेतस्थळ - https://mahatenders.gov.in वर उपलब्ध राहील |
| ३ | ई-निविदा पुर्व बैठकीची तारीख, वेळ व स्थळ | दिनांक १९/१०/२०२६, सकाळी १०.३० वा. ते सकाळी ११.०० वाजेपर्यंत, मिनी कॉन्फरन्स हॉल, पहिला मजला, जिल्हा न्यायालय, अहमदनगर |
| ४ | ई- निविदाकारांची रक्कम व बयाना/अनामत रक्कम जमा करण्याचा पर्याय, अंतिम दिनांक व वेळ : | ई-निविदेचा भरणा फक्त Online & Net Banking द्वारे वा बयाना/ अनामत रक्मेचा भरणा फक्त Online -Net Banking द्वारेच दि. २८/१०/२०२६ रोजी सायंकाळी ५:३० वाजेपर्यंत भरणे आवश्यक राहील.<br>रक्कम भण्यासाठीचा तपशील -<br>https://mahatenders.gov.in |
| ५ | ई-निविदा (तांत्रिक लिफाफा परिशिष्ट -अ ) उघडण्याची तारीख, वेळ : | दि. ३०/१०/२०२६ रोजी सायंकाळी ०५:३० वाजता जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर यांचे निजीकक्षात अथवा माननीय प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर यांचे आदेशानुसार. |
| ६ | आर्थिक लिफाफा परिशिष्ट -ब उघडण्याची तारीख, वेळ : | ज्या तांत्रिक निविदा परिशिष्ट-अ मध्ये यशस्वी झालेल्या आहेत त्यांना ई-मेल व्दारे वेळ व तारीख कळविली जाईल. |
| ७ | ई-निवीदा पाठविण्याचा पत्ता : (संकेतस्थळ) | https://mahatenders.gov.in |
| ८ | दुरध्वनी क्रमांक : | ०२४१-२३५११११ |

सदर कामांसाठीची इतर माहिती खालीलप्रमाणे :-

| निविदा किंमत | अनामत रक्कम (E.M.D) | एक वर्षा करीता कामाची अंदाजे रक्कम | सुरक्षा ठेव (Security Deposit) | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| रू.१०,०००/- (ना परतावा) | रू. १,००,०००/- | रू. ५०,४६,१३४/- | स्वीकृत निविदेच्या ३ टक्के | १ वर्षे |

उपरोक्त ई - निविदेच्या अटी व शर्ती व अधिक माहिती संकेतस्थळ https://mahatenders.gov.in तसेच https://ahmednagar.dcourts.gov.in वर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्रमांक ०२४१-२३५११११ यावर संपर्क साधावा.

सूचनेमध्ये नमुद केलेल्या वेळापत्रकानुसार ई - निविदा पुस्तिका फॉर्म खरेदी / डाउनलोड / बिड भरणे / बिड समाविष्ट करणे / सेवा शुल्क जमा करणे / अनामत रक्कम जमा करणे ही सर्व प्रक्रिया विहीत वेळेत पूर्ण करणे अत्यावश्यक आहे याची ई-निविदाधारकांनी नोंद घ्यावी.

(एस. बी. कचरे)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
अहमदनगर.

अहमदनगर.
दिनांक :- ८/१०/२०२६

## जिल्हा व सत्र न्यायालय, अहमदनगर

## ई-निविदा सुचना

जिल्हा न्यायालय, अहमदनगर येथे पोक्सो न्यायालया करीता लिपीक-टंकलेखक ०३ पदे व बहुउद्देशिय गट -ड कर्मचारी (शिपाई इ.) ०२ पदे तसेच विशेष जलदगती न्यायालया करीता लिपीक-टंकलेखक ०३ पदे व बहुउद्देशिय गट -ड कर्मचारी (शिपाई इ.) ०२ पदे व संगमनेर येथील विशेष जलदगती न्यायालया करीता लिपीक-टंकलेखक ०३ पदे व बहुउद्देशिय गट -ड कर्मचारी (शिपाई इ.) ०२ पदे बाहययंत्रणेद्वारे कंत्राटी पध्दतीने १ वर्षे कालावधीकरीता उपलब्ध करुन घेणेसाठी संस्था/कंत्राटदारांकडून विहीत नमुन्यात ऑनलाईन ई-निविदा **दोन लिफाफा (तांत्रिक व व्यापारी)** पध्दतीने मागविण्यात येत आहेत. त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे -

| अ.क्र. | तपशील | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | ई-निविदा वृत्तपत्रात प्रसिध्दी दिनांक | | |
| २ | ई-निविदा विक्री व डाउनलोड सुरु करण्याचा दिनांक | | |
| ३ | ई-निविदा/सादर करण्याचा दिनांक | | |
| ४ | ई-निविदा भरण्याचा/सादर करण्याचा अंतिम दिनांक | | |
| ५ | ई-निविदा उघडण्याचा दिनांक | | |

| निविदा क्रमांक | न्यायालयाचे नाव व ठिकाण | उपलब्ध करुन घ्यावयाच्या सेवा | एकुण पदांची संख्या | कामाची अंदाजे किंमत रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | पोक्सो न्यायालय, अहमदनगर. | लिपीक-टंकलेखक | ३ | |
| | | बहुउद्देशिय गट -ड कर्मचारी (शिपाई इ.) | २ | |
| २ | विशेष जलदगती न्यायालय, अहमदनगर. | लिपीक-टंकलेखक | ३ | |
| | | बहुउद्देशिय गट -ड कर्मचारी (शिपाई इ.) | २ | |
| ३ | विशेष जलदगती न्यायालय, संगमनेर, जि. अहमदनगर. | लिपीक-टंकलेखक | ३ | |
| | | बहुउद्देशिय गट -ड कर्मचारी (शिपाई इ.) | २ | |

१. उपरोक्त ई-निविदा सुचनेतील अधिक माहितीकरीता इच्छूक निविदाकारांनी संकेतस्थळ https://mahatenders.gov मध्ये पहावे.

२. सहभागी होणा-या निविदाकारांना ऑनलाईन ई-निविदा सादर करण्यासाठी रु. १०,०००/- ना-परतावा प्रति निवीदा भरावे लागतील. ना-परतावा ई-निविदा शुल्क रु. १०,०००/- (प्रति निविदा फॉर्म) इतकी रक्कम व बयाना/अनामत रक्कम रु. १,००,०००/- ही दि. २८ /१०/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत जमा करणे आवश्यक आहे.

३. ई-निविदा सुचना उपरोक्त संकेतस्थळावर दि. १५/१०/२०२६ वेळ सकाळी ११.०० वाजेपासुन ते दि. २८ / १०/२०२६ वेळ:- सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत उपलब्ध होतील.

४. निविदाकारांना / कंत्राटदारांना उक्त नमुद न्यायालयांत करावयाच्या कामांची व्याप्ती व माहिती जाणून घेणे कामी न्यायालयांना समक्ष भेट दयावयाची असल्यास, कार्यालयीन कामकाजाचे वेळेत सकाळी ११ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत संबंधीत न्यायालयांतील प्रबंधक/ अधिक्षक / सहा. अधिक्षक यांचे वेळेनुसार भेट देवू शकतात.

५. एक किंवा सर्व ई-निविदा कोणतेही कारण न देता कोणत्याही वेळी रद्द ठरविण्याचा तसेच निविदा अटी व शर्ती बदल करणेचा अधिकार कार्यालयाने राखुन ठेवलेला आहे.

(एस. बी. कचरे)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
अहमदनगर.

अहमदनगर.
दिनांक :- ८ / १०/२०२६

**जिल्हा व सत्र न्यायालय, अहमदनगर**

**वि व र ण प त्र (तांत्रिक लिफाफा क्र.१ मध्ये संस्थेने सादर करावयाची कागदपत्रे)**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | | ई-निविदा कंत्राटदाराचे/संस्थेचे कंपनीचे नांव | |
| २ | | कंपनीचा पुर्ण पत्ता ( मोबईल क्रमांक, दुरध्वनी क्रमांक, ई मेल आयडी यासह ) | |
| ३ | | ई-निविदाकाराकडे सदर कामाचा शासकीय कार्यालयांत लिपीक- टंकलेखक, बहुउद्देशिय गट -ड कर्मचारी (शिपाई इ.) व तत्सम सेवा पुरविण्याचे अनुभव प्रमाणपत्र जोडणे आवश्यक. | |
| ४ | | ई-निविदाकाराने स्वत:वर चालु महिन्यात कोणताही गुन्हा दाखल नसल्याबाबतचे व न्यायालयात कोणतेही प्रकरण प्रलंबित नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र रूपये ५००/- चे बॉन्ड पेपरवर (नोटरी केलेले) दाखल करावे. | |
| ५ | | ई-निविदाकाराने खालील बाबींची पुर्तता केली काय? | |
| | १ | कंपनी/संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्राची छायांकित प्रत ( दुकान व आस्थापना अधिनियम अंतर्गत) | |
| | २ | कंपनी/संस्थेचे जीएसटी प्रमाणपत्राची छायांकित प्रत | |
| | ३ | कंपनी/संस्थेचे मागील तीन आर्थिक वर्षाच्या आयकर प्रमाणपत्राची छायांकित प्रत (सन २०२३-२४, २०२४-२५, २०२५-२६) सोबत जोडावे. | |
| | ४ | कंपनी/संस्थेचे ई.एस.आय.सी. प्रमाणपत्राची छायांकित प्रत | |
| | ५ | कंपनी/संस्थेचे पी.एफ. प्रमाणपत्राची छायांकित प्रत | |
| | ६ | कंपनी/संस्थेचे प्रोफेशनल टॅक्स प्रमाणपत्राची छायांकित प्रत | |
| | ७ | कंपनी/संस्थेचे पॅन कार्डची छायांकित प्रत | |
| | ८ | ई निविदा शुल्क, बयाना/अनामत रक्कम (E. M. D. ) भरली आहे काय? (नसल्यास सुक्ष्म व लघु, मध्यम उदयोग विकास अधिनियम-२००६ अंतर्गत संस्था नोंदणीकृत असल्याचे प्रमाणपत्राची छायांकित प्रत जोडावी) | |
| | ९ | सहकारी संस्था असल्यास मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालय, अहमदनगर या नावाने निविदा भरणेबाबत मा. सहा. निबंधक | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | सह संस्था यांचे चालु महिन्यातील अनुमती पत्र. | |
| | १० | **रू. ३०,००,०००/- रूपये तीस लक्ष** मात्र राष्ट्रीयकृत बँकेचे सॉल्व्हन्सी प्रमाणपत्र मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर यांचे नावाचे असणे व निविदे सोबत जोडणे आवश्यक आहे. स्विकृत निविदाधारकाने मुळ सॉलव्हन्सी प्रमाणपत्र कार्यारंभ आदेशापूर्वी करारनामा करतेवेळी सादर करणे बंधनकारक राहील. | |
| | ११ | गुणवत्ता सेवा प्रमाणपत्र ISO 9001-2015 (Quality Management ) जोडणे आवश्यक. | |
| | १२ | कंपनी / संस्थेचे लेबर लायसन्स (Labour License) वैध (Valid ) प्रमाणपत्राची छायांकित प्रत सोबत जोडावी. | |
| | १३ | निविदाधारक संस्थेस शासनाच्या कोणत्याही विभागामार्फत काळया यादीत टाकलेले नसल्याचे निविदाधारकाने १०० रूपये किमतीचे स्टॅप पेपरवर प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे. | |
| | १४ | कंपनी/संस्थेचे मागील तीन आर्थिक वर्षाच्या टर्नओव्हर प्रमाणपत्राची सी. ए. यांनी प्रमाणित केलेली छायांकित प्रत (सन २०२३-२४, २०२४-२५, २०२५-२६ ) सोबत जोडावी. | |

अ.क्र. १ ते १४ अनुसार कागदपत्रे तांत्रिक लिफाफामध्ये सादर केले असतील अशाच संस्थांचे आर्थिक लिफाफातील दरपत्रक उघडण्यात येतील तसेच **अनावश्यक कागदपत्रे जोडण्यात येवु नये**. अपुर्ण कागदपत्रे असलेल्या कंपनी/संस्थांची निविदा अपात्र ठरविण्यात येईल व त्याबाबत नंतर कोणत्याही प्रकारची तक्रार स्विकार्य राहणार नाही.

दिनांक:- ८/ १०/२०२६

ई-निविदाकाराचे नांव,सही व शिक्का

## जिल्हा व सत्र न्यायालय, अहमदनगर

## प्रपत्र क.२ (अ)

## दरपत्रक (आर्थिक लिफाफा क.२)

| | | |
|---|---|---|
| निविदा मागविणा-या कार्यालयाचे नाव | - | जिल्हा व सत्र न्यायालय, अहमदनगर |
| कामाचे स्वरुप | - | जिल्हा न्यायालय, अहमदनगर येथे पोक्सो न्यायालया करीता लिपीक-टंकलेखक ०३ पदे व बहुउद्देशिय गट -ड कर्मचारी (शिपाई इ.) ०२ पदे तसेच विशेष जलदगती न्यायालया करीता लिपीक-टंकलेखक ०३ पदे व बहुउद्देशिय गट -ड कर्मचारी (शिपाई इ.) ०२ पदे व संगमनेर येथील विशेष जलदगती न्यायालया करीता लिपीक-टंकलेखक ०३ पदे व बहुउद्देशिय गट -ड कर्मचारी (शिपाई इ.) ०२ पदे बाहय यंत्रणेव्दारे कंत्राटी पध्दतीने १ वर्षे कालावधीकरीता उपलब्ध करून घेणे |
| निविदा क्रमांक | - | |
| कंत्राटदाराच्या संस्थेचे/कंपनीचे नांव | | |
| कंत्राटदाराच्या संस्थेचा/कंपनीचा संपूर्ण पत्ता | - | |
| कंत्राटदाराच्या संस्थेचा/कंपनीचा संपर्क दूरध्वनी | - | |
| कंत्राटदाराच्या संस्थेचा/कंपनीचा नोंदणी क्रमांक | - | |
| कंत्राटदाराच्या संस्थेचा/कंपनीचा सेवाकर क्रमांक | - | |
| कंत्राटदाराच्या संस्थेचा/कंपनीचा जी.एस.टी. नोंदणी क्रमांक | - | |

## प्रपत्र - १

| निविदा क्रमांक | न्यायालयाचे नाव व ठिकाण | उपलब्ध करुन घ्याव याच्या सेवा | मागणी करण्यात आलेली कर्मचारी संख्या | मागणी केलेल्या पदासाठी कंत्राटी सेवा पुरविण्यासाठी कंत्राटदाराने मागणी केलेली रक्कम (वार्षिक खर्च) | सेवा कर (वार्षिक खर्च) | एकूण रक्कम रुपये स्तंभ ५+६ | एकूण रक्कम अक्षरी रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | पोक्सो न्यायालय, अहमदनगर | लिपीक-टंकलेखक | ३ | | | | |
| | | शिपाई | २ | | | | |
| २ | विशेष जलदगती न्यायालय, अहमदनगर | लिपीक-टंकलेखक | ३ | | | | |
| | | शिपाई | २ | | | | |
| ३ | विशेष जलदगती न्यायालय, संगमनेर, जि. अहमदनगर. | लिपीक-टंकलेखक | ३ | | | | |
| | | बहुउद्देशिय गट -ड कर्मचारी (शिपाई इ.) | २ | | | | |

निविदेची एक वर्षासाठी होणारी एकूण रक्कम रु.

(अक्षरी रु. )

---------------------

(कंत्राटदाराचे नांव, सही, शिक्का दिनांक)

**(सुचना : वरिल दर पत्रक हे आर्थिक लिफाफा क्र.२ मध्ये अपलोड करावे).**

**टिप** :- कंत्राटदार संस्था/कंपनी यांची कंत्राटी सेवा उपलब्ध करुन देतांना, विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्र.पदनि२५१२/प्र.क्र.१५७/का.१२, दि. २७ जानेवारी २०१५ मधील निर्देशांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक आहे. सदर शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in यासंकेतस्थळावर २०१५०१२७१५१५५३८३१२ या क्रमांकावर उपलब्ध आहे.

## प्रपत्र - २ (ब)

### कंत्राटदाराकडून मागणी करण्यात आलेला अतिकालीक भत्ता

| अ.क्र. | पद | अतिकालीक भत्याची रक्कम रुपये (प्रति तास) |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | लिपीक-टंकलेखक | |
| २ | बहुउद्देशिय गट -ड कर्मचारी (शिपाई इ.) | |

---------------------

(कंत्राटदाराचे नांव, सही, शिक्का, दिनांक)

अ) स्तंभ क्र.३ मधील माहिती कंत्राटदारांनी भरावयाची आहे.

ब) प्रपत्र-२ मध्ये कंत्राटदाराने स्तंभ २ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या पदासाठी प्रति तास किती रक्कमेची मागणी करण्यात येत आहे ते नमुद करावे. उदा. साफसफाईच्या एका पदासाठी प्रति तास किती अतिकालीक भत्त्याची मागणी (ओवर टाईम) कंत्राटदार करणार आहे ते त्याने स्तंभ-३ मध्ये नमुद करणे अपेक्षित आहे.

क) कंत्राटदारांनी नमुद केलेली वेतनाची रक्कम व अतिकालीक भत्याची रक्कम किमान वेतन कायदयातील तरतुदींपेक्षा कमी नसावी.

ड) प्रपत्र-२ (अ) व प्रपत्र - २ (ब) कंत्राटदारांनी लिफाफा क.२ मध्ये दर नमुद करून अपलोड करावे.